नि.फौ.ख.क्रं.१५४/२०२२
सरकार वि. विनोद वगैरे
नि.क्र.३०

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी.**

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही –

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | सचिन रामलाल धनजुडे, |
| वय सुमारे | : | ३१ वर्ष, व्यवसाय– कोतवाल, |
| निवासस्थान | : | ब्रम्ही, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**सरतपास – सहा. सरकारी वकील पी. आर. लिंगायत मॅडम यांच्यामार्फत–**

**१.** घटना २०२२ साली घडली होती. घटना रात्री ०१:०० वाजेच्या दरम्यान घडली होती. घटना निघवी ते आसगाव दरम्यान असणाऱ्या नहराच्या पुलाजवळ घडली होती. मी, मंडळ अधिकारी साहेब, दोन तलाठी, दोन पोलीस अधिकारी गस्तीवर होतो. बाचेवाडीकडून आम्हाला एक टिप्पर येताना दिसला. मंडळ अधिकारी साहेबांनी टिप्परला थांबवुन टिप्पर चालकाची विचारपूस केली. चालकाने सांगितले होते की, टिप्परमध्ये मुरूम आहे. टिप्पर चालकाला साहेबांनी त्याचे नाव आणि गाडी मालकाबाबत विचारले. टिप्पर चालकाने स्वत:चे नाव शहारे सांगितले आणि गाडी मालकाचे नाव सावरबांधे असे सांगितले. टिप्पर चालकाला साहेबांनी रॉयल्टीबाबत विचारणा केल्यावर त्याने त्याच्याकडे रॉयल्टी नसल्याचे सांगितले. त्यानंतर मंडळ अधिकारी साहेबांनी चालकास तो टिप्पर पवनी बस स्थानकात लावण्यास सांगितले. साहेबांनी मला आणि संदेशकुमार मेश्राम यांना टिप्परमध्ये बसवून बस स्थानकात जाण्यास सांगितले होते. बस स्थानकात जात असताना आसगाव जवळ टिप्पर मालक सावरबांधे आला. त्याने टिप्पर थांबवला. त्यानंतर त्याने ड्रायव्हरच्या सिट खालुन हतोडा काढला. हतोडयाच्या मदतीने त्याने टिप्परच्या मागचा पल्ला उघडला आणि टिप्पर मधील अर्धा मुरूम खाली केला. त्याने आम्हाला म्हटले होते की, तुम्हाला उतरायचे असेल तर खाली उतरा नाहीतर तुम्हाला सोबत घेऊन टिप्पर पळवून नेईन. त्यानंतर आम्ही उतरलो. त्यानंतर सावरबांधे आणि टिप्पर चालक बोरगावच्या दिशेने टिप्पर घेऊन पळून गेले. आरोपींना मी ओळखतो. आता मला निशाणी क्रमांक ०१ वरील आरोपी क्रमांक २ चे छायाचित्र दाखवण्यात आले. तो टिप्पर मालक आहे. आज न्यायालयात आरोपी क्रमांक १ म्हणजेच टिप्पर चालक हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपींचे वकील व्ही.एल.देशमुख यांनी उलटतपास थोडया वेळाकरीता तहकुब करण्याची विनंती केली. विनंती मंजूर.</u>**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| स्वा/– | स्वा/– |
| **(व्ही. आर. फरकुंडे)** | **(व्ही. आर. फरकुंडे)** |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२), | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२) |
| पवनी. | पवनी. |
| ०७/०२/२०२६ | ०७/०२/२०२६ |

**<u>शपथेवर उलट तपास आरोपींतर्फे वकील व्ही. एल. देशमुख साहेब यांच्यामार्फत –</u>**

२. घटनेच्यावेळी तलाठी कार्यालय ब्रम्ही येथे कोतवाल पदावर मी कार्यरत होतो. सन २०२२ साली कोतवाल पदाचा मला ७ वर्षांचा अनुभव होता. पथकामध्ये उपस्थित राहण्याबाबत मला तहसीलदार साहेबांकडून आदेश प्राप्त झाला होता. त्या आदेशाचा क्रमांक आणि तारीख माझ्या लक्षात नाही. टिप्पर क्रमांक मला सांगता येणार नाही. घटनेची तारीख माझ्या लक्षात नाही. पोलीसांना बयान देतेवेळी मी सांगितले होते की,''बोरगावच्या दिशेने टिप्पर घेऊन पळून गेले''. आता मला माझे पोलीस बयान वाचुन दाखवण्यात आले. त्यामध्ये **बोरगावच्या दिशेने** असे नमूद नाही. पोलीसांनी ते का नमूद केले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींवर खोटया स्वरूपाची कार्यवाही करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कोणत्याही प्रकारची मुरूमाची अवैध वाहतूक करीत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, टिप्पर मालकाने आम्हाला हतोडा दाखवून टिप्पर पळवून नेल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास – काही नाही**.

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| स्वा/– | स्वा/– |
| **(व्ही. आर. फरकुंडे)** | **(व्ही. आर. फरकुंडे)** |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२), | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२) |
| पवनी. | पवनी. |
| ०७/०२/२०२६ | ०७/०२/२०२६ |